**महत्वाचे/कालमर्यादित**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे – १८. लेखा विभाग
क्र.लेखा/पेन्शन/३२अ/कावि/११५/२०१५
दिनांक :- ०३/०७/२०१५

**विषय :- "नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणी कार्यपध्दती" नमुना नं-१ भरुन घेणेबाबत...**

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७/०७/२०००.

**परिपत्रक,**

२/- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अनियो:१००५/१२६/सेवा-४ दि. ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये राज्य शासनाने ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना अंमलात आणली आहे. सदरची योजना महानगरपालिकेचे कर्मचा-यांना जशीच्या तशी लागु करण्यात आली आहे.

त्यानुसार जे कर्मचारी दि. ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा तदनंतर महानगरपालिका सेवेत रुजू (स्थायी अस्थापनेवर) झाले आहेत अशा कर्मचा-यांच्या वेतनामधुन निवृत्तीवेतन अंशदान योजनेअंतर्गत वेतनाचे (मुळपगार+ग्रेडपे+म.भत्ता) १/१० निवृत्तीवेतन अंशदान हिस्सा वर्गणी म्हणून कपात करण्यात येत आहे. त्यामुळे निवृत्तीवेतन अंशदान म्हणून कपात करण्यात आलेल्या रकमांचा लेखाजोखा ठेवणेकामी प्रथमत: प्रत्येक कर्मचा-यास निवृत्तीवेतन लेखा क्रमांक देणे आवश्यक आहे. त्याकामी शासनाने विहीत केलेला नमुना-१ सोबत जोडला आहे. सदर नमुना-१ प्रत्येकी तीन प्रतीत भरुन लेखा विभागाकडे पाठवावा. नमुना-१ च्या उजव्या कोप-यात कर्मचा-याचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र लावून संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांनी छायाचित्र साक्षांकित (Cross signed) करणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमुना-१ तीन प्रतीत लेखाविभागास प्राप्त झाल्या नंतर त्यावर लेखा विभागामार्फत अंशदान खाते क्रमांक देवून दोन प्रती संबंधित विभागाकडे संदर्भासाठी परत पाठविल्या जातील पैकी एक प्रत कर्मचा-याच्या सेवानोंद पुस्तकात चिकटविण्यात यावी व दुसरी प्रत कर्मचा-याच्या वैयक्तीक नस्तीमध्ये ठेवण्यात यावी. अशी कार्यपध्दती अपेक्षीत आहे.

तथापि ब-याच विभागाकडून याबाबत काटेकोरपणे पालन केले जात नाही नव्याने रुजु झालेल्या सेवकांचे बाबतीत वेतन अदा करताना परस्पर Probity Soft कडून अंशदान निधी क्रमांक घेवुन अंशदान निधी हप्ता कपात केला जातो तथापि सदर सेवकाचे अंशदान निधी सभासदत्वाचा फॉर्म लेखा विभागाकडे सादर केला जात नाही परिणामी राजीनामा ,नियत/स्वेच्छा सेवानिवृत्ती नंतर अशा सेवकांचा अंशदान निधी रकमांचा परतावा करणेचे कामात अडथळा निर्माण होतो.

तरी या परिपत्रकान्वये सर्व विभाग प्रमुखांना कळविण्यात येते की वर दिलेल्या सुचनांचे विभागांनी तंतोतंत पालन करुन खालीलप्रमाणे पुर्तता करावी

१) विभागात नव्याने नियुक्त झालेले स्थायी आस्थापनेवरील कर्मचा-यांचे सदरचे योजनेचे फॉर्म भरुन घेवुन दि. १३/०७/२०१५ पर्यंत लेखा विभागाकडे न चुकता पाठवावेत.

२) १/११/२००५ नंतर स्थायी आस्थापनेवर नियुक्त झालेले व आपले विभागाकडे सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी सदर योजनेचे फॉर्म भरलेबाबत त्यांची वैयक्तीक नस्ती व सेवापुस्तकावरुन खातरजमा करावी व ज्या सेवकांचे फॉर्म भरलेले नाही अशा सेवकांचे फॉर्म भरणेसाठी संबंधित आस्थापना लिपिकाने लेखा विभागांशी संपर्क साधावा.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८.

**सोबत :- नमुना -१**
**प्रत :- महानगरपालिकाचे सर्व संबंधीत विभाग**

FORM I

# PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION, PIMPRI - 411018

(As refered to in para no. 8 of Government Resolution, Finance Department, No. CPS 1007/18/SER-4, dated 7th July, 2007)

## FORM OF APPLICATION FOR EMPLOYEES APPOINTED ON OR AFTER 01/11/2005

(To be furnished by the Employee through concern DDO in English in Tripliate)

To,

**Chief Account Officer**
Account Department
Pimpri Chinchwad Municipal Corporation
Pimpri-411 018

Attach passport size photo duly attested by the D.D O. on the front side.

Sir,

I hereby apply for getting the pension Account (PA) Number under the New D.C.P. Scheme.

1. Name of the Employee (In Block Letters)

| First Name | Middle Name | Surname |
|---|---|---|
| | | |

2. Employee No. :
3. Sex : Male/Female [ M ] [ F ]
4. Date of Birth (DD/MM/YY) : [ ] [ ] [ ]
5. Date of joining Govt. service (DD/MM/YY) : [ ] [ ] [ ]
6. Post on which appointed (Specify Group A/B/C/D) : [ A ] [ B ] [ C ] [ D ]
7. Designation & Pay Scale : .................... ....................
8. Residential Address along with Phone No. : ....................
9. a) Whether previously working in Government Office or any other Orgnization / Institution to which New D.C.F.S. is applicable : **YES / NO**
   b) If so, the Pension Account Number alloted earlier : [ N.A. ]

10. Details of Nominee (for accumulayions under the pension Account)

| Sr. No. | Name and full Address of Nominee (S) | Age | Date of Birth | Percentage of share payable | Priority of Nominee | Relationship with the Government servant |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |
| 5 | | | | | | |

11. I, Shri/Smt. ...................., am aware that till the Central Record Keeping Agency is appointed by the Central Government, any action/action / decision taken by the State Record Keeping Agency in consultation with Government, will be binding on me. I also understane that after appointment of Central Record Keeping Agency, the total amount standing to my credit at that time will be transferred to the said Agency.

Place -
Date -

**Signature of Employee**

## To be furnished by DDO

Certified that Shri./Smt./Kum ______________________________ has been appointed in (mention name and address of Office). The particulars given above are correct. I have also ascertained that he/she has not worked in government office or Zilla Parishad or aided secondary educational institution or non-agricultural university/college affiliated there to or agricultural university or in any orgnization or institution to which the New Defined Contribution Pension Scheme is applicable and that he/she has not been allotted the Pension Account Number previously.

D.D.O. CODE (Employee No.) - ________________

Designation of the Drawing and Disbursing Officer

DEPARTMENT CODE - ________________

REGION / TREASURY / SUB-TREASURY CODE- N. A.

Name ..............................................

Designation of the Drawing and Disbursing Officer

Full Office Address ..............................................

..............................................

..............................................

## OFFICE OF THE SRKA

NO.                                                                Date :

The application submitted by Shri./Smt .............................................. has been accepted and the following pension Account Number is alloted to him / her.

Pension Account Number : | | | | | | | | | | | | | | | | |

**Signature of the authorized**

**(Name)**

**Office Address**

(**N.B.** - One copy of this form should be retained by the S.R.K.A. The second copy should be pasted to the service book of the employee and the third copy should be kept in the personal file of the employee by the D.D.O.)

Note :

1) Appointment of Employee / Xerox Copy Attested.
2) Fill up minimum two nominee or maximum Three.